**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे — ४**
**जुलै—ऑगस्ट २०२४ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र(इ. १२वी) पुरवणी परीक्षेचे आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत**

## प्रकटन

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रु—मार्च २०२४ परीक्षेचा निकाल दिनांक २१/०५/२०२४ रोजी ऑनलाईन जाहीर झालेला असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुरवणी परीक्षा जुलै—ऑगस्ट २०२४ मध्ये घेण्यात येणार आहे. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे विद्यार्थी, ITI विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने इयत्ता १२वी साठी www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा खालीलप्रमाणे —

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामार्फत पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (परीक्षेस प्रविष्ट न झालेले), श्रेणीसुधार व तुरळक विषय घेऊन प्रविष्ट होणारे, ITI विषय घेऊन प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेद्वारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी) ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळांनी/कनिष्ठ महाविद्यालयांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांस याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | सोमवार दिनांक २७/०५/२०२४ ते शुक्रवार, दिनांक ०७/०६/२०२४ | शुक्रवार, दि.३१/०५/२०२४ ते शनिवार, दि.१५/०६/२०२४ | मंगळवार,दि.१८/०६/२०२४ |
| विलंब शुल्क | शनिवार, दिनांक ०८/०६/२०२४ ते बुधवार, दिनांक १२/०६/२०२४ | | |

सदर परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी जुलै—ऑगस्ट २०२४ मध्ये होणाऱ्या परीक्षेची आवेदनत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फतच भरावी. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे —

१ ऑनलाईन आवेदनपत्र भरतांना फेब्रु—मार्च २०२४ परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी या परीक्षेतील माहिती आवेदनपत्रात ऑनलाईन घेता येईल.

२ श्रेणीसुधार विद्यार्थ्यांसाठी असलेल्या अटी व शर्तीनुसार श्रेणीसुधार करु इच्छिणाऱ्या फेब्रु—मार्च २०२४ परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी जुलै—ऑगस्ट २०२४ व फेब्रु—मार्च २०२५ अशा लगतच्या दोनच संधी उपलब्ध राहतील याची नोंद घ्यावी.

३ सर्व विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी निर्धारित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

४ आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांमध्ये कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे —४

दिनांक — २४/०५/२०२४
E:\Pardeshi1\Avedanpatra\JulyAug24\HSC.docx1

क्र.कोविमं/उ.मा./परीक्षा/581
दिनांक :- 24/05/2024

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा - सातारा/ सांगली / कोल्हापूर.

विषय :- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) जुलै-ऑगस्ट 2024 च्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत..

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) जुलै-ऑगस्ट 2024 च्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत उचित कार्यवाही करावी. कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क बँक ऑफ इंडियाच्या Virtual Account व्दारे मंडळाच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या (Excel यादी), तसेच सर्व पुनर्परीक्षार्थी (Repeater), श्रेणीसुधार (Class Improvement) आणि तुरळक विषय घेऊन (Isolated) ऑनलाईन पध्दतीने आवेदन पत्र भरलेल्या विद्यार्थ्यांच्या यापुर्वीच्या इ.12 वी परीक्षेच्या गुणपत्रिकांची छायाप्रत मंगळवार, दि.18/06/2024 रोजी जिल्हा वितरण केंद्रावर सादर कराव्यात.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर